# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०२/०४/२०२६ (गुरूवार )

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## वाहनासह १० लाख ०७ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## कन्हान पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक ३१/०३/२०२६ रोजी कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा घाटरोहना हद्दीतील नदीचे पात्रातून ट्रॅक्टर मध्ये अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा घाटरोहना ते वाघोडा रोडवर सापळा रचुन कारवाई केली असता महिंद्रा कंपनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रॅक्टरचा **चालक नामे १) अनिकेत चंद्रभान राऊत, वय २३ वर्ष, रा. काळापाटा, ता. पारशिवनी आणि ट्रॅक्टर हा मिळुन आला वाहन मालक २) निलेश गोमकाळे, वय ३५ वर्ष, रा. तामसवाडी हा असल्याची माहीती प्राप्त झाली.पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली.**

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन किंमती १०,००,०००/—रूपये २) ०१ ब्रास रेती किंमती ७०००/— रूपये असा एकुण १०,०७,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ३०३(२), ४९, ३(५) भा.न्या.सं, सहकलम ४८(८), ४८(७) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान १९८४, सहकलम १५ पर्यावरण सरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




## गोवंश जनावरांना निर्दयतेने बांधुन ठेवणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ०६ गोवंश जनावरांची सुटका, भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ३१/०३/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा जवळी येथे ग्रामपंचायतच्या मागे काही गोवंश/जनावरे चारापाण्याची सोय न करता निर्दयतेने बांधुन ठेवले आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा जवळी शिवार येथे घटनास्थळी जावुन पाहणी केली असता आरोपी १) गजानन शंकर बावणे, रा. जवळी, ता. भिवापूर, जि. नागपूर याने एकुण ०६ गोवंश जनावरे जनावरांना चारापाण्याची कोणतीही सोय न करता निर्दयतेने बांधुन ठेवलेले मिळुन आले. जनावरांच्या मालकांबाबत विचारपुस केली असता त्यानी आरोपी क्र.

२) नासीर शेख, रा. मांढळ, ता. कुही, जि. नागपुर यांच्या सांगण्यावरून दोन दिवसापुर्वी आजुबाजुच्या गावातुन खरेदी करून आणले व जवळी येथे जनावरांना निर्दयतेने बांधुन ठेवले असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून ०६ गोवंश जनावरे किंमती ४५,०००/— रूपये असा एकुण ४५,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपींविरूद्ध पोलीस स्टेशन भिवापूर येथे प्राण्यांचा छळ प्रतिबंधा अधिनियम, सहकलम महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने